| | |
|---|---|
| **MHLA130002472026** | दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८६/२०२६<br>कांताबाई  वि. निरंक |

## <u>निशाणी क्र.१ वरील आदेश</u>

**०१.** प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ मधील तदतुदींप्रमाणे 'वारस प्रमाणपत्र' (Heirship Certificate) मिळण्याची मागणी केलेली आहे.

**०२.** अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, मयत कमलाकर गोपाळ गडगळे हा अर्जदार यांचा मुलगा आहे. अर्जदाराव्यतिरीक्त मयत कमलाकर गोपाळ गडगळे यांना अन्य कोणीही वारस नाहीत. मयत कमलाकर गोपाळ गडगळे हा दि.२२.१०.२०१६ मौजे रेणापूर ता.रेणापूर येथे मयत झाला आहे. तसेच मयत कमलाकर गोपाळ गडगळे याचे शासकीय कार्यालयात अर्जदार यांचे नावाची वारस नोंद लावण्यासाठी गेले असता त्यांना वारस प्रमाणपत्र आणण्याविषयी सांगितले. सबब, अर्जदार हे मयत कमलाकर गोपाळ गडगळे यांचे कायदेशीर वारस असल्याने वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता विनंती केली आहे.

**०३.** अर्जदाराने केलेल्या मागणीविरुध्द कोणास काही हरकत असल्यास ती नोंदविण्यासाठी दि. ०३.०४.२०२६ रोजी जाहिरनामा दैनिक 'विश्वउदय' मध्ये जाहीर प्रगटन नि.१३ अन्वये प्रसिध्द करण्यात आले. नि.०८ कडील जाहिरनाम्याचा अहवाल पाहता दि.०७.०४.२०२६ रोजी सदरचा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आलेला आहे. परंतु अर्जदाराच्या मागणीविरुध्द कोणीही हरकत नोंदविलेली नाही अथवा न्यायालयासमक्ष हजर होऊन वारसा प्रमाणपत्राची मागणी केली नाही.

०४.		अर्जदाराने त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ अर्जदार कांताबाई यांचे सरतपासणीचे शपथपत्र नि.१४ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदाराने या प्रकरणात नि.१५ वर मयताचे मृत्यु प्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्डच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत.

०५.		अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदाराच्या मागणीविरुध्द कोणीही हरकत अथवा आक्षेप न नोंदविल्यामुळे अर्जदार हे मयत कमलाकर गोपाळ गडगळे यांचे वारस असल्याचे निर्विवादपणे स्पष्ट होते. अर्जदाराचे कथन निर्विवाद राहील्याने अर्जदाराच्या कथनावर विश्वास न ठेवण्यासारखे काहीही दिसून आले नाही. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी पुढील आदेश पारित करीत आहेः–

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार कांताबाई गोपाळ गडगळे हया मयत कमलाकर गोपाळ गडगळे रा.रेणापूर ता.रेणापूर जि.लातूर यांच्या वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) योग्य त्या न्यायालयीन शुल्क मुद्रांकावर देण्यात यावे.

Digitally signed by POOJA ANAND APTE
Date: 2026.06.09 16:01:17 +0530

**(पी.ए.आपटे)**

**दि.०९.०६.२०२६.**		**दिवाणी न्यायाधी, क.स्तर,रेणापूर**